# Sale of old Vehicle

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, शीव येथील २ निर्लेखित करण्यात येणारी वाहने जशी आहेत तशा अवस्थेत लिलावाद्वारे विक्री करण्यासाठी जाहिरात देण्यात येत आहे. सदर वाहनांची माहिती खालील प्रमाणे आहे.

निर्लेखित करण्यात येणाऱ्या वाहनांचा तपशिल :

| अ.क्र. | वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | वाहन खरेदी दिनांक | लिलावाचा दिनांक व वेळ | वाहन पाहण्याचे व लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | MH-43-AF-5879 | TATA INDIGO | 12/2010 (14 yrs) | १७/०४/२०२५<br>सकाळी ११.०० वा. | मध्यवर्ती प्रयोगशाळा, निर्मल भवन, ४ था मजला, शिळ महापे रोड, महापे, नवी मुंबई-४००७१० |
| 2 | MH-01-BG-0562 | TATA INDIGO | 08/2012 (12 yrs) | | |

## अटी व शर्ती

१) बोलीदाराने अनामत रक्कम रु.५,०००/- रोखीने मध्यवर्ती प्रयोगशाळा, महापे येथे लिलावाच्या वेळी जमा करावी.

२) दि. १०/०४/२०२५ ते १६/०४/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत वर नमुद केलेल्या ठिकाणी वाहने पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

३) दि. १७/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत बोलीदाराने मध्यवर्ती प्रयोगशाळा, महापे येथे लिलाव करण्याकरीता हजर रहावे.

४) उच्चतम बोलीदाराने लिलावाची रक्कम धनाकर्षाद्वारे (DD) महाराष्ट्र प्रदूषण नियत्रण मंडळाच्या नावे जमा करावी.

५) सदर धनाकर्ष जमा झाल्यानंतर बोलीदारास वाहनांचा ताबा व गेटपास देण्यात येईल.

६) सदर वाहन विक्री करण्याचे अंतिम अधिकार सक्षम प्राधिकारी यांना आहेत. ( प्रक्रिया थांबवणे व पुढे ढकलणे किंवा रद्द करणे इत्यादी)

७) बोलीदारास आधारकार्ड व वास्तव्याचा पुरावा सादर करावा लागेल

८) २ वाहनांच्या बाबत न्यायिक क्षेत्र मुंबई राहील.

९) सदर वाहने उच्चतम बोलीदाराने विकत घेतल्यावर या वाहनांवरील "महाराष्ट्र शासन" हे लिहिलेले खोडावे. तसेच वाहनांचा भविष्यात गैरउपयोग/अपघात वगैरे झाल्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जबाबदार राहणार नाही, त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी वाहने खरेदीदाराकडे राहील.

१०) यशस्वी झालेल्या उच्चतम बोलीदाराने मंडळातील वाहने खरेदी केल्यानंतर वाहनांची तोडफोड करुन विल्हेवाट लावावयाची असल्यास स्वत: प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संपर्क साधून कार्यवाही करावी. मंडळातील जुनी वाहने एकदा खरेदी केल्यानंतर मंडळ कोणत्याही कार्यवाहीसाठी जबाबदार राहणार नाही.

११) बोलीदाराने वाहने घेताना रु.१००/- च्या स्टँप पेपरवर हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.